# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 07.09.2024** **वार – शनिवार**

---

**गणपती आगमन**

भाद्रपद शुद्ध चतुर्थीच्या शुभमुहूर्तावर आज घरोघरी तसेच सार्वजनिक गणेश मंडळांत लाडक्या बाप्पाचं आगमन होत आहे. पुण्यातील मानाचे कसबा, तांबडी जोगेश्वरी, गुरूजी तालिम, तुळशीबागेचा आणि केसरीवाड्याच्या गणपतींचं आज सकाळी वाजत गाजत उत्सव मंडपात आगमन झालं. मानाच्या पहिल्या आणि दुसऱ्या गणपतीची चांदीच्या पालखीतून मिरवणूक निघाली होती. मानाचा तिसरा फुलांच्या आकर्षक रथात विराजमान झाला होता. मानाचा चौथा आणि पाचव्या गणपतीचं पारंपारिक लाकडी रथातून आगमन झालं. श्रीमंत भाऊसाहेब रंगारी सार्वजनिक गणपती ट्रस्ट, श्रीमंत दगडूशेठ सार्वजनिक गणपती ट्रस्ट, अखिल मंडई मंडळाच्या श्रींचंही मुहूर्तावर आगमन झालं.

**काश्मीर**

काश्मीरच्या श्रीनगरमधील लाल चौकातील पंच हनुमान मंदिरात गणपती बाप्पाच्या मूर्तीची कायमस्वरूपी प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली आहे. सीमेवर संरक्षण करणारे जवान, काश्मीरमधील मराठी बांधवांच्या हस्ते काल हा सोहळा पार पडला. पुण्यातील वंदे मातरम् संघटना, सरहद संस्था आणि युवा फिनिक्स सोसायटी ट्रस्ट यांच्या सहकार्यानं गणपती बाप्पांची ही मूर्ती कायमस्वरूपी इथं बसविण्यात आली आहे.

**मूर्ती-विघटन**

यंदाचा गणेशोत्सव पर्यावरणपूरक वातावरणात पार पाडण्यासाठी पिंपरी चिंचवड शहरात प्रथमच मूर्ती विघटन केंद्रांची निर्मिती करण्यात आली आहे. क्षेत्रीय कार्यालयनिहाय 40 फूट गुणिले 30 फूट आकाराची आणि 5 फूट खोल अशा एकंदर 15 भव्य विघटन केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे अशी माहिती आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली. महापालिकेच्या आठही क्षेत्रीय कार्यालयांअंतर्गत प्रत्येकी दोन विघटन केंद्राची निर्मिती करण्यात आली आहे. तसंच नदी आणि तलावांचं प्रदूषण टाळण्यासाठी नागरिकांनी मूर्ती संकलन केंद्रांमध्ये गणेशमूर्तींचं दान करून महापालिकेला सहकार्य करावं, असं आवाहन देखील आयुक्तांनी केलं आहे.

**पाहणी**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त आणि प्रशासक शेखर सिंह यांनी शहरातील सर्व प्रमुख गणेश विसर्जन घाटांची तसंच महापालिकेच्या वतीनं करण्यात आलेल्या सोयी सुविधांची पाहणी केली. त्यामध्ये रावेत इथला जाधव विसर्जन घाट, थेरगाव चिंचवड पूल विसर्जन घाट, चिंचवडमधील सुभाष घाट, मोशीचा इंद्रायणी नदी विसर्जन घाट, मोशी खाण या स्थळांचा समावेश आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आवश्यक ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा, निर्माल्य कुंडाची व्यवस्था, कृत्रिम विसर्जन हौदांची स्वच्छता आणि डागडुजी करणं अशा विविध सूचनाही आयुक्तांनी संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांना दिल्या.

**बस**

पुणे महानगर परिवहन महामंडळ म्हणजेच पीएमपीएमलच्या वतीनं गणेशोत्सवात भक्तांसाठी एकंदर 620 जादा बस गाड्यांचं नियोजन करण्यात आलं आहे. नियमित फेऱ्यांव्यतिरिक्त होणाऱ्या अतिरिक्त फेऱ्यांसाठी तिकीट दरात पाच रुपयांची वाढ करण्यात येणार आहे तर ही विशेष बस सेवा असल्यानं रात्री बारानंतर कोणत्याही सवलतीचे पासेस चालणार नसल्याचं,

महामंडळातर्फे कळविण्यात आलं आहे. स्वारगेट, हडपसर, पुणे महापालिका भवन, डेक्कन, कात्रज, धनकवडी, भोसरी, निगडी, चिंचवडगाव आदी ठिकाणाहून या जादा गाड्या सुटणार आहेत.

**<u>आरती</u>**

डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग प्रशालेत दरवर्षीचा गणेशोत्सव संकल्पनेवर आधारित असतो. प्रतिवर्षी घेतलेल्या संकल्पनेवर गणपतीची आरती तयार केली जाते. ती विद्यार्थ्यांना तालासुरात शिकवून म्हणवून घेतली जाते. 2009 ते 2024 या काळात, विद्यमान मुख्याध्यापिका चारुता प्रभुदेसाई यांनी लिहिलेल्या आरत्यांचा, आशय आरती संग्रह रमणबाग युवा मंचाद्वारे प्रकाशित करण्यात आला आहे. या पुस्तिकेत देण्यात आलेल्या क्यू आर कोड च्या मदतीनं कुणालाही आरतीची चाल सहजपणे समजावून घेता येते. प्रशालेत हा आरती संग्रह विनामूल्य उपलब्ध आहे.

**<u>पंचनामे</u>**

कृषी विभागाच्या ताज्या अहवालानुसार राज्यातील दहा जिल्हयांत पिकांचं नुकसान झालं आहे. यामध्ये खरिपातील सुमारे आठ लाख 48 हेक्टर क्षेत्रावरील पिके बाधित झाली असून, नुकसानाचे पंचनामे सुरू असल्याची माहिती राज्याचे कृषी संचालक विनयकुमार आवटे यांनी दिली. कृषी विभागाच्या 24 ऑगस्टपासून आतापर्यंतच्या अहवालानुसार खरीप हंगामातील पिकांमध्ये कापूस, सोयाबीन, तूर, बाजरी, मूग, उडीद, मका, ज्वारी पिकांचं आणि कांदा, भाजीपाल्याचंही नुकसान झालं आहे. अतिपावसामुळं पिकांचं नुकसान झालं असल्यास शेतक-यांनी पीक विमा कपंनीस कळविलं पाहिजे, जेणेकरून पंचनामे करण्याच्या कामासही गती येईल, असंही आवटे म्हणाले.

**<u>राजे</u>**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आद्य क्रांतिकारक राजे उमाजी नाईक यांची जयंती आज साजरी करण्यात आली. प्र- कुलगुरू प्राध्यापक डॉक्टर पराग काळकर यांनी राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. शैक्षणिक आणि प्रशासकीय विभागांचे विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर सेवक, विविध संघटनांचे पदाधिकारी आणि विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

**<u>हॉकी</u>**

पुण्यात सुरु असलेल्या चौथ्या हॉकी इंडिया वरिष्ठ पुरुष आंतरविभागीय राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत. आज सकाळच्या सत्रात क्रीडा सेवा नियामक मंडळानं सशस्त्र सेना संघावर 8-0 अशी सहज मात केली. तर अन्य सामन्यात केंद्रीय सचिवालय संघानं थेट कर संकलन नियामक मंडळावर 3-2 असा निसटता विजय मिळवला.

पुणे आणि परिसरात आज आकाश ढगाळ राहीलं. उद्याही असंच वातावरण आणि कमाल तापमान 30 अंश सेल्सियस राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**